# टिळकनगर पोलीस ठाणे सायबर पथकाने सीईआयआर कार्यप्रणालीच्या माध्यमातून हरवलेले मोबाईल फोन हस्तगत करून तक्रारदार यांना परत केले.

टिळकनगर पोलीस ठाणेच्या हद्दीतुन अनेक तक्रारदारांचे मोबाईल फोन गहाळ झालेले होते. त्यांनी त्या बाबत पोलीस ठाणेस तक्रारी दाखल केलेल्या होत्या. टिळकनगर पोलीस ठाणेचे सायबर पथकाने सदर गहाळ झालेल्या मोबाईल ची सर्व तांत्रिक माहीती सीईआयआर कार्यप्रणालीवर अद्यावत करून सदर गहाळ झालेल्या मोबाईलचा सातत्याने शोध घेउन त्यापैकी ३५ मोबाईल परत मिळविण्यात यश प्राप्त केले. सदरचे मोबाईल हे त्यांचे मुळ मालकांना दिनांक. ०३/०७/२०२५ रोजी पोलीस ठाण्यास बोलावुन परत करण्यात आले. सदर बाबत तक्रारदारांनी समाधान व्यक्त करून पोलीसांचे आभार मानले आहे. सदरची कामगीरी वपोनि श्री शशिकांत पवार यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल राठोड, पोशि महाजन व मपोशि पावसे यांनी बजावली.

